मंगळवार दि.८ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ३५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता
बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com
Lokneta News - लोकनेता न्युज
8459977904
epaper.lokneta.in

# भाजपने मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली होती:पण तरीही उद्धव ठाकरे काँग्रेस:राष्ट्रवादीसोबत गेले-संजय शिरसाट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणूक काही दिवसांवर आली आहे. त्या अनुषंगाने सर्वक्ष पक्षांकडून जोरदार तयारी सुरू झाली आहे. यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती असा सामना होणार आहे. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडत आहेत. त्यातच शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी उद्धव ठाकरे यांच्याबद्दल मोठा गौप्यस्फोट केला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर पहिली अडीच वर्षे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री राहतील, अशी ऑफर भाजपने दिली होती. पण त्यानंतर उद्धव ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत गेले, असे संजय शिरसाट म्हणाले. या गौप्यस्फोटानंतर राजकीय वर्तुळात ठाकरेंच्या भूमिकेवर खमंग चर्चा रंगली आहे.

संजय शिरसाट यांनी सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना त्यावेळी घडलेला सगळा प्रसंग सांगितला. ते म्हणाले, २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालात भाजप-शिवसेनेला बहुमत मिळाले होते. त्यावेळी सर्व काही ठरले होते. पहिली अडीच वर्षे उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देण्याचेही भाजपने मान्य केले होते. परंतु चर्चा करण्यासाठी कुणीतरी एकजण पाठवा, असे भापजने सांगितले होते,असा दावा शिरसाट यांनी केला. परंतु, उद्धव ठाकरे यांनी चर्चेला माणूस पाठवला नाही. एकनाथ शिंदे यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. पण, तुला जायचे तर तू जा असे एकनाथ शिंदेंना म्हणाले. भाजपसोबत जायचे नव्हते, तर मग इतका आटापिटा का आणि कशासाठी केला होता, असा सवाल उपस्थित करत उद्धव ठाकरेंनी पदासाठीच हे सर्व केले आणि त्याला संजय राऊत कारणीभूत आहे, असा आरोप संजय शिरसाट यांनी केला आहेत.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात कार्यकर्त्यांना परत घेऊ पण निघून गेलेल्या आमदारांसाठी परतीचे दोर कापले आहेत, असे उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील प्रवेश सोहळ्यात म्हटले होते. त्यावर देखील संजय शिरसाट यांनी भाष्य केले आहे. परतीचे दोर कापायला तुमच्याकडे कुणी आले पाहिजे, आम्ही तुमच्याकडे येणार नाही. तुमच्याकडे यायला कोण तयार आहे. डुबणाऱ्या पक्षाकडे कुणीही जात नाही. नगरसेवक किंवा कार्यकर्ता आला असेल, तो देखील उमेदवारीचे तिकीट घेऊन आला असेल. त्यांच्यासाठी तुमचे दरवाजे उघडे आहेत. आम्हाला तुमच्या दरवाजा किंवा पक्षात यायचे नाही, असे शिरसाट म्हणाले.

संजय शिरसाट म्हणाले, निवडणुकीच्या निकालानंतर तुमचा पक्ष कुठे असेल ते पाहा. आम्ही वाघ आहोत. पाळीव प्राण्यासारखे दिल्लीला चकरा मारत नाहीत. शिवसेनाप्रमुखांच्या स्वाभिमानाची फौज होती ती आता राहिली नाही. तुमच्याकडे लाचारांची फौज तयार झाली आहे. लाचारी करुन आपल्याला मिळेल ते घेणे एवढेच काम ठाकरे गटाचे आहे, अशी टीका संजय शिरसाट यांनी केली.

## स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

केज तालुक्यातील स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते . खरोखर अशाच प्रकारे मुला मुलींना प्रशिक्षण शिबीर/ स्पर्धेचे आयोजन करायला पाहीजे .मुलां मुली मधील कला गुणांना वाव मिळाला जाईल ,त्यांच्यात धैर्य , जिद्द निर्माण होईल. खरे पाहता कलीयुग चालु आहे या मध्ये जनसामान्यांच्या जीवाला संरक्षणाची गरज आहे .वातावरण दुषीत झालेले आहे ,अशा प्रकारचा उपक्रम स्वामी विवेकानंद इंग्लीश स्कुल मध्ये राबवला त्याबद्दल शाळेचे कौतुक पालक, जनसामान्यातुन होत आहे .या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक श्री. कोकीळ सर यांच्या हस्ते झाले यावेळी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतीमेचे पुजन करण्यात आले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड क्रीडा संयोजक यांनी केले या स्पर्धेला पंच म्हणून श्री. ठोंबरे सर, श्री. नेमटे सर यांनी काम पहिले क्रीडा शिक्षक श्री. बोबडे सर श्री. ठोंबरे सर, श्री. जाधव सर, श्री काकडे सर, श्री. क्रीडा शिक्षक यांचा सत्कार श्री विनोद गुंड सर क्रीडा संयोजक यांनी केला या स्पर्धेला तालुक्यातील अनेक शाळेतील खेळाडूनी सहभाग नोंदवला .

## बालाजी पाटील खतगावकर यांच्या उपस्थितीत शिक्षक बांधवांच्या गुरू गौरव सोहळा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

मुक्रामाबाद येथे सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,गोजेगाव ता.मुखेड जि.नांदेड द्वारा मुखेड तालुक्यातील शैक्षणिक,सामाजीक व सांस्कृतीक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या शिक्षक बांधवाचा गुरू गौरव सन्मान सोहळा आयोजीत करण्यात आला होता.यावेळी शिक्षण संस्थेचे सचीव तथा शिक्षण महर्षी मा.व्यंकटराव पाटील गोजेगावकर साहेब,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.एकनाथरावजी शिंदे साहेबांचे खाजगी सचीव मा.बालाजी पाटील खतगावकर साहेबांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमा अंतर्गत मुखेड तालुक्यातील खाजगी गटातुन मुखेड तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावलेली बालाजी पाटील खतगावकर यांची शाळा विद्या विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,बाराहाळी या शाळेचा सन्मान मुख्याध्यापक श्री.पंचगट्टे सर, उपमुख्याध्यापक श्री.दावलपुरे सर, श्री.घोडके सर, प्रा.गडम सर,प्रा.लंगोटे सर, प्रा.मुंगनाळे सर यांचा सन्मान करण्यात आला.तसेच विद्या विकास विद्यालयातील प्रा.मुंगनाळे सर,प्रा.लंगोटे सर,श्री.घोडके सरांना आदर्श गुरू गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.यावेळी मुखेड तालुक्यातील १७० शिक्षकांचा सन्मान गुरु गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.त्याबद्दल सरस्वती सेवभावी संस्थेचे सचीव मा.व्यंकटराव पाटील गोजेगावकरांचे व त्यांच्या सर्व पदाधिकार्यांचे बालाजी पाटील खतगावकर यांनी आभार मानले आहेत.

## ११ ऑक्टोंबर रोजी येणाऱ्या बौद्ध समाज संवाद यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा-निलेश जाधव



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

मेहकर येथील अशोका वाटिकेमध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली तथा मेहकर विधानसभा नेते नागवंशी संघपाल पनाड यांच्या नेतृत्वामध्ये महत्त्वपूर्ण बैठक संपन्न. निलेश जाधव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषनामध्ये सांगताना सांगितले संवाद यात्रा का निघत आहे ?याचे आत्मचिंतन करण्याची गरज समाजाला आहे. कारण आपण २०१९ च्या निवडणुकीच्या मतदानाची टक्केवारी व २०२४ च्या निवडणुकीची टक्केवारी तपासून बघितली तर यामध्ये खूप तफावत आहे. ज्या बुद्धिजीवी लोकांनी सविधानाच्या नावाखाली समाज बांधवांची दिशाभूल केली. त्यांना धडा शिकवण्याची वेळ आली आहे. त्यामुळे सर्व समाज बांधवांनी बाळासाहेब आंबेडकर यांच्या पाठीमागे या २०२४ विधानसभेमध्ये खंबीरपणे उभे राहावे. असे सांगितले व अशोक भाऊ सोनोने यांच्या नेतृत्वामध्ये येणाऱ्या संवाद यात्रेचे आपल्या जिल्ह्यामध्ये जंगी स्वागत करून मान्यवरांचे विचार आत्मसात करावे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष न.ल. खंदारे, महिला जिल्हाध्यक्ष साबळे ता,ई साबळे सर, मेहकर ता.अध्यक्ष मोरे सर, लोणार ता. अध्यक्ष राहुल अंभोरे सर, युवा नेते अनित्य घेवंदे,बळीभाऊ मोरे,मोबिन भाई, दिलीप राठोड, दीपक पाडमुख, दिपक अंभोरे,आबाराव वाघ, भुजंग शिरसाट , जितु भाऊ डोंगरदिवे, सिद्धार्थ अवसरमोल , प्रदीप सरदार, महेंद्र मोरे, वसंतराव वानखेडे, मिलिंद खंदारे ,शेख ताई, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष मोरे, राजहंस जावळे, महेंद्र पनाड, अचित पाटोळे, राहुल सरदार , गवई सर,गौतम गवई ,यांनी परिश्रम घेतले.

## पोहरादेवीच्या मंदिरात पंतप्रधान सोबत राठोड यांनी घेतले दर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष बंजारा समाजाचे नेते भगवान राठोड यांचे पंतप्रधान यांच्या कार्यक्रम पत्रिकेत नाव असल्याने पोहरादेवीच्या मंदिरात पंतप्रधान सोबत पोहरादेवी येथील जगदंबा माता मंदिर, संत सेवालाल महाराज मंदिर,संतुलन रामराव महाराज समाधी अशा ३ ठिकाणी दर्शन घेण्याचा योग लागल्यामुळे भगवान राठोड यांच्यासह बंजारा समाजामध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले.

राठोड हे गेले अनेक वर्षापासून समाजकारण, राजकारणात सक्रिय आहेत संत सेवालाल बंजारा बंजारा लमान तांडा समृद्धी योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील बंजारा तांड्यांना महसुली दर्जा देणे,ग्रामपंचायत स्वतंत्र निर्माण करणे,या विषयात ते समाजामध्ये काम करत आहेत त्यांच्या पाठीशी नेहमी पोहरादेवीच्या संत महंतांचा आशीर्वादे राहिलेला आहे, ५ ऑक्टोंबर रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बंजारा विरासत नंगारा भवन या वास्तु संग्रहालयाचा थाटात उद्घाटन झालं या उद्घाटन कार्यक्रमाला देशभरातला बंजारा बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नांदेड विमानतळावर उतरून हेलिकॉप्टरने पोहरादेवी येथे उपस्थित राहिले

पोहरादेवी येथे जगदंबा माता मंदिर,संत सेवालाल महाराज मंदिर, संत रामराव महाराज समाधी अशा तीन ठिकाणी पंतप्रधानांनी भेट देऊन देवी आणि संतांचे दर्शन घेतले यावेळी जगदंबा माता मंदिरामध्ये कंधार लोहा तालुक्यातील भगवान राठोड यांना पंतप्रधान कार्यालयातून तयार झालेल्या कार्यक्रम पत्रिकेत संधी मिळाल्याने राठोड देवीच्या मंदिरात दर्शनाच्या वेळी उपस्थित राहिले, पंतप्रधान महोदयांचे स्वागत केले ही बातमी कंधार लोहा तालुक्यात सर्वत्र पसरली विषयी तांड्या तांड्यातून आनंद व्यक्त केला जात असून आपल्या तालुक्यातील भूमिपुत्राला सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांला पंतप्रधान महोदयांना भेटण्याची संधी मिळाल्याने कंधार लोहा तालुक्यात कौतुक करून याविषयी त्यांचे अभिनंदन होत आहे,

सामान्य कार्यकर्त्याला भारतीय जनता पार्टीमध्ये काम करत असताना सर्वोच्च नेतृत्वाला भेटण्याची संधी मिळते हेच यावरून सिद्ध होत या वेळी बंजारा समाजातील मानाचा कडा जो नायकाच्या हातात असतो तो भेट देण्यात आला सदरील कडा बनवण्याची जबादारी देवीभक्त शेखर महाराजांनी राठोड यांच्या कडे दिली होती,ती जबाबदारी भगवान राठोड यांनी पार पाडली.बंजारा समाजातला सर्वोच्च पद असलेले नायक आणि नायकाच्या हातात मानाचा असणारा कडा देशाचे नायक पंतप्रधान यांना देताना देवीभक्त शेखर महाराज यांनी दिला यावेळी धर्मगुरु बाबूसिंग महाराज उपस्थितीत होते. कार्यक्रमाला राज्यभरातून लखोंच्या संख्येने बंजारा समाजानी हजेरी लावली,लोकांचा समुद्र अशी आलोट गर्दी सभेला होती.

## झाडे लावा झाडे जगवा

### चारोळी

दुसऱ्याचं दुःखही
तुला न सांगता कळायला हवं
आसवांची भाषा जाणूनी
फुंकर घालत मिळेल समाधान नवं.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## प्रसिद्ध भजन गायक मुकुंद बापू पंडित यांचे वृद्धापकाळाने निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**



श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील प्रसिद्ध भजन गायक मुकुंद बापू पंडित यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन ते ८५ वर्षाचे होते मुकुंद पंडित यांना तालुक्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये तात्या नावाने ओळखले जायचे गेल्या ५ दशकांपासून तात्या हे भजन , गौळण,शास्त्रीय संगीत गायक म्हणून त्यांनी एक स्वतःची ओळख निर्माण केली होती १९ ८० साली आकाशवाणी पुणे केंद्र यांच्या वतीने मुकुंद बापू पंडित यांना पार्श्वगायक म्हणून सन्मानित करण्यात आले होते.तर अनेक वेळा दूरदर्शन वाहिनी वरून अभंग आणि गवळण प्रसारित होत असायच्या श्रीगोंदा तालुक्यातील भजन क्षेत्रातला एक कोहिनूर हिरा हरला तात्याच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.पेडगाव येथील त्यांच्या मुळ गावी भिमा नदीच्या काठी त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.

संपादकीय

# राज्यमाता ते सुंदरी...

लोकनेता न्यूज नेटवर्क

राज्य सरकारने निर्णयांचा जो काही धडाका लावला आहे तो आता आचारसंहिता लागू झाल्यावरच थांबेल. तोवर या महायुती सरकारने 'कल्याणकारी निर्णयां'चे 'कार्पेट बॉंबिंग' करून एकही विषय किंवा समाजगट शिल्लक ठेवायचाच नाही, असे ठरविलेले दिसते. गाय हा पशू महाराष्ट्रात यापुढे राज्यमाता असणार आहे.समाज माध्यमांमध्ये या निर्णयानंतर 'गाय आई, तर वडील कोण...' या व अशा अनेक विनोदांचे पेव फुटले असले तरी या निर्णयाने खरोखरच राज्यातील गोवंशवृद्धी, संरक्षण किंवा संगोपन या दृष्टीने काय फरक पडणार आहे? 'गाय हा एक उपयुक्त पशू आहे...' या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या टोकाच्या तर्कशुद्ध भूमिकेपर्यंत सर्वांना जाणे शक्य नसले तरी गायीला 'राज्यमाता' न म्हणता बऱ्याच गोष्टी करण्याजोग्या आहेत. आता सरकार गोशाळांना प्रतिदिन प्रतिगोमाता ५० रुपये चारा-अनुदान देणार आहे; असे सांगितले जाते. हे खरे असेल तर गोवधबंदीमुळे आपल्याच गोठ्यात भाकड गायींना सांभाळणाऱ्या शेतकऱ्यांना येणाऱ्या खर्चाचा वाटा कोण उचलणार? अनेक शेतकरी सांगतात, की गाय भाकड झाली की पूर्वी तिला बाजारात २० ते २५ हजार रुपयांची किंमत मिळत असे. आता भाकड गाय चार ते पाच हजार रुपयांनाही विकली जात नाही.राज्यातल्या भाकड गायीही मारल्या जाऊ नयेत आणि त्यांचे त्यांच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत पालनपोषण व्हायचे असेल तर ही जबाबदारी प्रामुख्याने सरकार आणि गोसेवा करणाऱ्या स्वयंसेवी किंवा धार्मिक संस्थांनी घ्यायला हवी. हा बोजा शेतकऱ्यांवर पडता कामा नये. सरकारला गायींची इतकी काळजी असेल तर तिचे प्रतिबिंब आकडेवारीत पडायला हवे होते. प्रत्यक्षात महाराष्ट्रातील एकूणच गायींचे आणि त्यातही देशी वाणाच्या गायींचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे.पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गायीच्या दुधापासून पंचगव्यापर्यंत सर्व गोजन्य पदार्थांचे फायदे सांगितले आहेत. पण देशी वाणाच्या गायींची संख्या वाढतानाच त्या अधिकाधिक उत्पादक होऊन शेतकऱ्यांना लाभकारक कशा होतील, यासाठी सरकारने काहीच ठोस केलेले नाही. भाकड गाय असेल तरी तिच्यापासून मिळणारे शेण, गोमूत्र... यामुळे ती सांभाळणे आर्थिकदृष्ट्या फायद्याचे ठरते, असे दावे केले जातात. पण तसे प्रत्यक्षात शेतांवर आणि शेतकऱ्यांच्या गोठ्यात होते का? तसे होतच नसेल तर केवळ गायींना 'राज्यमाता' असा दर्जा देण्याने काय होणार?निवडणुकांच्या धामधुमीत आणि विजयाचे व्यूह रचण्याच्या भाऊगर्दीत किती बाष्कळ आणि वाह्यात निर्णय घेतले जातात, याचे दुसरे ठळक उदाहरणही राज्य सरकारने घालून दिले आहे. मुंबई ते पुणे या शहरांना जोडणाऱ्या विजेवरच्या शिवनेरी बससेवेच्या गाड्यांमध्ये आता 'शिवनेरी सुंदरी' असणार आहेत. मुळात हवाई सुंदरीऐवजी 'हवाई सेविका' असा शब्द आता प्रचलित होत असताना ही 'सुंदरी' आली कुठून? मुंबई ते पुणे या चार ते साडेचार तासांच्या प्रवासात प्रवाशांना अशी काय व किती मदत लागते की त्यासाठी एसटीने अशा नेमणुका कराव्यात? राज्य सरकारचा आणि एकूणच परिवहन खात्याचा भर हा राज्यातली एकूण एसटीसेवा कशी सुधारेल, एसटी स्थानके स्वच्छ कशी राहतील, तिथे प्रवाशांना स्वच्छ व स्वस्त अल्पोपहार कसा मिळेल, यावर नको का? राज्यातला गाड्यांचा ताफा जुना झाला आहे. मध्यंतरी छप्पर उडालेली एक एसटीची बस विदर्भात धावताना दिसली होती.एसटी स्थानकांवर आरोग्य सेवा किंवा महिला बचत गटांतर्फे खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्याची कल्पना चांगली आहे. मात्र, त्या आधी राज्यातली सर्व बस स्थानके सुरक्षित, किमान स्वच्छ व्हायला हवीत. अगदी मोठ्या शहरांमधली एसटीची स्वच्छतागृहेही आत पाऊल टाकण्याच्या लायकीची नसतात. मग तालुका व गावपातळीवरचे तर विचारायलाच नको. 'शिवनेरी' बससेवेत 'सुंदरी' देण्यापेक्षा या मूलभूत सोयी व सुविधांकडे एसटीने लक्ष देण्याची गरज होती. महामंडळाच्या नव्या अध्यक्षांना नवनव्या कल्पना सुचतात आणि त्या ते अमलात आणतात, हे खरे असले तरी प्राधान्य नेमके कशाला द्यायचे; याचा विवेक बाळगायला हरकत नसावी. राज्यभर विखुरलेल्या एसटी महामंडळाच्या आगार, स्थानके तसेच इतर जमिनींवर बरीच वर्षे अनेकांचा डोळा आहे.गेल्याच महिन्यात मंत्रिमंडळाने महानगरांमधील एसटीच्या ३९ स्थानके, आगारांचा व्यापारी तत्त्वावर विकास करण्याचे ठरविले. या आधी झालेल्या अशा विकासातून सरकारचा नेमका फायदा किती झाला आणि किती विकसकांनी ठरल्याप्रमाणे काम केले नाही; याचा लेखाजोखा लोकांसमोर ठेवणे, हे 'शिवनेरी सुंदरी' नेमण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. मात्र, सध्या सरकारला विजयाची आस लागली असून त्यामुळे वाट्टेल त्या निर्णयांचा बेबंद धडाका चालू आहे. राज्यमाता आणि तिच्या यजमानांनी याबाबत सरकारला माफ केले पाहिजे

# राज्यमाता आणि गोठ्यातले आपण

लोकनेता न्यूज नेटवर्क



सावरकर गायीस केवळ 'उपयुक्त पशु' असे म्हणतात? 'राज्यमाते'चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीतहा शाहू- फुले- आंबेडकर यांचा महाराष्ट्र यापुढच्या काळात शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा- अलीकडचा लोकप्रिय राजकीय शब्दप्रयोग करायचा तर- आभाळभर ऋणी राहील. या ऋणातून उतराई कसे व्हावे हे पुढच्या कित्येक पिढ्यांना कळणार नाही; इतके हे ऋण मोठे आहे. त्याचा संबंध या शंकराचार्यांनी आधी 'मातोश्री'वर पायधूळ झाडून, तेथील पाहुणचार झोडून, पोटभर आशीर्वाद देऊन नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही तसेच आशीर्वाद दिले या त्यांच्या धार्मिक चातुर्याशी अजिबात नाही. असे सर्व डगरींवर एकाच वेळी पाय रोवून उभे राहता येणे यालाच अध्यात्म असे म्हणत असावेत. आणि असेही आत्मा एक आहे, असे म्हणतातच. तेव्हा 'मातोश्री'वर केलेली आशीर्वादवर्षा 'वर्षा'वासीयावरही केली तर कुठे बिघडते असाही स्थूलातून सूक्ष्मात जाणारा विचार शंकराचार्यांनी केला असणार. या ऋणाचा संबंध आपणास आणखी एक शंकराचार्य प्राप्त झाले, या आनंदवार्तेशीही नाही. पूर्वीच्या काळी या भारतवर्षात तीन आणि एक अर्धा इतकेच शंकराचार्य असत. हे अर्थातच पं. नेहरूंचे पाप. त्यांनी आयआयटी, आयआयएम, एम्स यांचा पुरेसा विस्तार केलाच नाही. त्यामुळे फक्त मूठभरांनाच त्याचा लाभ झाला. हे मूठभर त्यामुळे कायम पं. नेहरूंचा जप करीत बसतात. शंकराचार्यांबाबतही त्यांनी असाच हात आखडता घेतला असावा. काही का असेना, त्यातून त्यांचा हिंदुद्वेषच दिसून येतो. या देशाचा, हिंदूंचा आकार लक्षात घेता अधिकाधिक शंकराचार्यांची आपणास गरज होती. ती गेली दहा वर्षे यथासांग पूर्ण होताना दिसते. त्याचाच एक भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर शंकराचार्य निर्मिती आपल्या देशात सुरू आहे. खरे तर 'एक जिल्हा, एक शंकराचार्य' अशी योजनाच हाती घ्यायला हवी. तसे झाल्यास हिंदूंचा उद्धार झालाच म्हणून समजा. तथापि तो होईपर्यंत सध्या उपलब्ध असलेल्या शंकराचार्यांवर आपणास भागवून घ्यावे लागेल. तूर्त त्यांनी आपणावर केलेल्या उपकारांविषयी.ते आहेत गोमातेस 'राज्यमाता' दर्जा देण्याच्या त्यांच्या सूचनेबद्दल. या राज्यातील नव्हे तर समग्र देश आणि खरे तर पृथ्वीवरील गोधन यामुळे खूश झाले असून त्यांच्या सुमधुर हंबरड्याने आसमंत कसा भरून गेला आहे. यामुळे मेनका गांधींसह सर्वच प्राणीप्रेमींस आनंद अनावर झाला असून तो कसा व्यक्त करावा हे न कळून रस्त्यारस्त्यांवर कोणा गोप्रेमीने पुण्यसंचयासाठी भरवलेल्या फरसाण-गाठ्यांचा रवंथ करीत बसलेल्या, हाडे वर आलेल्या राज्यमातांचा शोध घेण्यासाठी झुंडीच्या झुंडी घराबाहेर पडल्या आहेत. गोमातेस 'राज्यमाता' जाहीर करा हा अत्यंत बुद्धिजन्य, पंडिती, प्रज्ञावान इत्यादी सल्ला निवडणुकेच्छू एकनाथरावांस साक्षात शंकराचार्यांनी दिला. धर्मरक्षक, धर्मप्रेमी आणि धर्मवीरांचे अनुयायी एकनाथराव हा शंकराचार्यांचा शब्द खाली कसा पडू देतील? त्यांनी ताबडतोब मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय मांडला आणि त्यास नवे गोप्रतिपालक अजितदादा पवार यांनी त्वरेने अनुमोदन दिले. जुने गोप्रतिपालक देवेंद्र ऊर्फ देवाभाऊ यांनी हे श्रेय घेऊ नये यासाठी अजितदादांनी दाखवलेली चपळाई अगदी नोंद घ्यावी अशी. गोमातेचे प्रेमच असे आहे. तेव्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा मुद्दा मंजूर होणे हा उपचार ठरला. लगेच सरकारी अध्यादेश निघाला. 'राज्यमाता' असे शिक्कामोर्तब गायीगायींवर झालेही. सुरुवातीस थोडा विलंब झाला तो 'राज्यमाता' की 'राजमाता' या शब्दच्छलाचा गुंता सुटेपर्यंत. अखेर 'राज्यमाता' हा शब्दप्रयोग उचित असल्याचे प्रमाणपत्र अलीकडचे वैय्याकरणी संजय शिरसाट आणि तत्समांनी दिल्यानंतर सरकारी आदेश प्रसृत झाला म्हणतात.आता लवकरच- बहुधा २४ तासांत- सरकारी आज्ञावलीही प्रसिद्ध होणार असून तीत 'राज्यमातेशी कसे वागावे' इत्यादी राजशिष्टाचारसंबंधी मुद्दे असतील. जसे की यापुढे रस्त्यावर फतकल मारून बसलेल्या राज्यमाता दिसल्यास वाहतुकीत व्यत्यय येत असल्याच्या कारणांसाठी राज्यमातांस उठवता येणार नाही. वाहतुकीने वाटल्यास राज्यमातेस वळसा घालून जावे अथवा तसेच वाहनांत बसून राहावे. शेतकऱ्यांस अथवा गोधन प्रतिपालकांस यापुढे दूध देत नाही, सरळ घरी येत नाही, रानोमाळ भटकते इत्यादी कारणांसाठी शेपटी पिरगाळता येणार नाही. राज्यमातेची शेपटी कशी काय पिळणार? निसर्गाच्या नियमानुसार या चतुष्पादाने खाल्लेल्या पदार्थांचे कोठेही उत्सर्जन झाले तरी त्यास यापुढे 'शेण' असे म्हणता येणार नाही. राज्यमातेच्या विष्ठेस शेण कसे म्हणणार? यावरून 'शेण खाल्ले' या अपमान निदर्शक शब्दप्रयोगासही कायमचे हद्दपार करण्याचा आदेश शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिल्याचे कळते. राज्यभरातील अशा राज्यमातांच्या वास्तव्यासाठी ठिकठिकाणच्या शाळा उपलब्ध करून द्याव्यात या केसरकर यांच्या मताची व्यवहार्यता तपासण्याचे काम सुरू आहे. ते झाले की या शाळांतून राज्यमातांच्या वास्तव्याची सोय होऊ शकेल. एरवीही या शाळांची अवस्था गोठ्यापेक्षा काही कमी नसल्याने तेथे राहण्याची संधी मिळाल्यास राज्यमातांस घरचे वातावरण अनुभवता येईल, हा यामागील विचार. आणि तसेही या शाळांत राहिले आहे काय? तेव्हा या पडक्या-झडक्या वास्तूंत राज्यमातांची सोय केल्यास काही पुण्य तरी सरकारच्या गाठीशी जमा होईल.या पाठोपाठ स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विज्ञानवादी वाङ्मयावर बंदी कशी आणता येईल याचेही प्रयत्न या संदर्भात सुरू करण्यात आले असल्याचे कळते. एकतर अलीकडच्या काळात विज्ञानवाद ही संकल्पनाच खरे तर कालबाह्य झालेली आहे. गावोगावी भरणारे सत्संग, नवनव्या बाबा- बापू- महाराजांचा उदय, त्यांच्या दर्शनासाठी आसुसलेल्या लहानथोरांची झुंबड, सर्वोच्च सत्ताधीशांकडून या पुण्यपुरुषांना दिला जाणारा आश्रय इत्यादी पाहिले की विज्ञानवादाचा फोलपणा मठ्ठातील मठ्ठासही लक्षात येईल. असे असताना कोण सावरकर आणि कसले त्यांचे विज्ञानवादी विचार! त्यांच्याविषयी आदर व्यक्त करायला स्वातंत्र्यवीर ही उपाधी आणि 'ने मजसी ने' गायिले की झाले. कशास हवा त्यांचा विज्ञानवादी विचार? हे सावरकर गायीस केवळ 'उपयुक्त पशु' असे म्हणतात? 'राज्यमाते'चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीत. तेव्हा सावरकरांनी तो केला असेल म्हणून काय झाले? एकदा का राज्यमातेचा दर्जा मिळाला की तीस 'उपयुक्त पशु' ठरवणाऱ्या सावरकरांस विसरलेले बरे. 'राज्यमाते'च्या पुत्राविषयीही सावरकर असेच काही अद्वातद्वा बोलले आहेत. त्यामुळे त्यांच्या अशा वाङ्मयावर एकदा बंदी घातली की प्रश्न मिटला. महाराष्ट्र सरकारनेच बंदी घातली म्हटल्यावर राज्याबाहेर त्यांचे वाचणार कोण आणि कशाला? यथावकाश सगळ्यांच्या मनात 'राज्यमाता' घर करून बसतील यात शंका नाही.फक्त कोणी आता 'राज्यपिता कोण' हा प्रश्न तेवढा उपस्थित करू नये. प्रत्येक 'मातेस' एक भिन्नलिंगी साथीदार असल्याखेरीज तूर्त तरी प्रजोत्पादन होऊ शकत नाही, हे खरे असले तरी उभयतांतील 'संबंध' हे क्षणिक असतात असे साक्षात आचार्य अत्रे यांनीच सांगून ठेवलेले आहे. (पाहा : स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंत काळची माता असते.) तेव्हा राज्यपिता कोण हा प्रश्न अयोग्य. हे असले क्षुद्र मुद्दे विसरून आपण सर्व जण गायींस राज्यमातेचा दर्जा देण्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करू या आणि हा दर्जा देता यावा म्हणून या राज्याची अवस्था जणू गोठा अशी केली याबद्दल सरकारचे आभार मानू या.

# माहिती साक्षरतेची गरज

लोकनेता न्यूज नेटवर्क

आपण पाणी, हवा, अन्न, धान्य, फळे, ध्वनी इ. प्रदूषणामुळे मानवी आरोग्य धोक्यात आहे हे वाचत असतोच; तसेच यामुळे होणारे परिणाम सहनही करत असतो. परंतु जी माहिती आपण रोजच अनेक माध्यमांतून ग्रहण करीत असतो तीही प्रदूषित असते, मात्र त्यामुळे होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक परिणामांबाबत मात्र आपण अनभिज्ञ असतो किंवा माहीत असूनही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. इतर प्रदूषणांप्रमाणेच माहितीच्या प्रदूषणातही मानवी सहभाग आहेच. भेसळयुक्त पाणी, प्रदूषित हवा ओळखण्याचे तंत्र मानवानी शोधले आहे, परंतु प्रदूषित माहिती कशी ओळखायची? आपण अशी माहिती रोजच ग्रहण करीत असतो का? त्यामुळे आपले मानसिक व शारीरिक नुकसान कसे होते? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा हा एक प्रयत्न.आपण असे करतो का? एखादी बातमी किंवा लेखाचे फक्त शीर्षक वाचून त्याबाबतचे मत तयार करणे, मित्राला वाईट अनुभव आल्यामुळे एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जाण्याचे टाळणे, एखादी बातमी अर्धवट ऐकून तशीच दुसऱ्यांना सांगणे व वाद निर्माण करणे, शेजाऱ्यांबद्दल काही तरी ऐकणे आणि त्याची शहानिशा न करताच दुसऱ्यांना सांगणे, एखाद्या रोगावर सिद्ध न झालेल्या उपचाराबद्दल वाचणे आणि मित्रांना सांगणे, इ. इ. या सर्व उदाहरणांमध्ये माहितीची विश्वासार्हता ठाऊक नसताना, तिची शहानिशा न करताच तशीच इतरांना पाठवणे म्हणजेच माहिती प्रदूषित करणे. आजकाल विविध प्रकारच्या माहितीच्या स्त्रोतांतून जसे ई-मेल, इन्स्टंट मेसेजिंग, सोशल मीडिया - यांतून माहिती अक्षरश: आपल्यावर आदळत असते. फोन 'स्मार्ट' झाल्यापासून आणि त्याला वेगवान इंटरनेटची जोड मिळाल्यापासून असा एकही दिवस जात नाही, की आपण माहिती ग्रहण केली नाही. या माहितीचे प्रमाण इतके वाढले, की ग्रहण करण्याऱ्या युजर्सना माहितीचा ओव्हरडोस झाला. अशा प्रकारच्या माहितीच्या प्रदूषणावर जगभरात संशोधन चालू आहे. विशेषत: मानवी आरोग्यावर होणाऱ्या परिणामांवर सर्वच विद्याशाखांमध्ये अभ्यास केला जात आहे. त्यामुळे माहितीचा ओव्हरलोड, माहितीचा व्हायरस, माहिती विकार, माहिती युद्ध इ. नवीन शब्दावली अस्तित्वात आली आहे.माहितीच्या प्रदूषणाचे दोन प्रकार आढळतात. हे प्रदूषण एक तर अनवधानाने केले जाते, किंवा जाणूनबुजून केले जाते. उदाहरणार्थ करोनाच्या काळात बरीचशी माहिती अनवधानाने पसरवली गेली. कधी कधी काही वर्तमानपत्रे, मासिके, दूरचित्रवाणी वाहिन्या बातम्या चुकीच्या शीर्षकाने प्रसिद्ध करतात. उदाहरणार्थ सन २०१९मध्ये प्रिन्स्टन विद्यापीठातील संशोधकांनी प्राण्यांवर साखरेचे प्रयोग करून काही निष्कर्ष काढले. अमेरिकेतील एका नामवंत वृत्तपत्राने ही बातमी 'साखर हे कोकेनप्रमाणे व्यसन आहे' अशा शीर्षकाखाली प्रसिद्ध केली. अशी बातमी साखर खाणाऱ्यांसाठी धक्कादायक ठरू शकते. बातमी संपूर्ण वाचल्यानंतर नेमके काय, याचा उलगडा होतो. इंटरनेटवरील काही संकेतस्थळे व्यंगात्मक असतात. उदा. अमेरिकेतील ढहश जपळेप. काही लोक अशा संकेतस्थळावरील लेख गांभीर्याने घेतात. काही वेळा दोन संकेतस्थळे इतकी सारखी दिसतात, की त्यातील विश्वासार्ह कोणते हे ओळखणे अवघड होते. त्यामुळे देखील माहितीच्या प्रदूषणात भर पडते.दुसऱ्या प्रकारात मात्र हेतुपुरस्सर काही उद्देश ठेऊन - जसे पैसे कमविणे, राजकीय फायद्यासाठी, त्रास देण्यासाठी - माहिती तयार करून पसरवली जाते. अशी विडंबनात्मक, दिशाभूल करणारी, नकली फेरफार केलेली माहिती मानवी जीवनास हानी पोहोचवणारी असते. उदाहरणार्थ नोकरीच्या बनावट जाहिराती, फसव्या गुंतवणूक योजना, कोटा प्रवेशासाठी तयार केलेली बनावट वैद्यकीय शैक्षणिक प्रमाणपत्रे, बनावट आर्थिक माहिती, घर खरेदीदारांना दिलेली लेखी खोटी आश्वासने, उत्पादनांच्या खोट्या जाहिराती (खरेदी केल्यानंतर समज देणाऱ्या) इ. अशा भूलथापांना अनेक लोक बळी पडून पैसा आणि वेळ वाया घालवतात. चूक लक्षात आल्यानंतर होणारा मनस्ताप आणि त्यामुळे होणारा शारीरिक त्रास वेगळाच. करोनाच्या काळात आरोग्याविषयी विश्वासार्ह माहिती स्रोतांमध्ये तोतयेगिरी करून जाणूनबुजून चुकीची माहिती पसरवली गेली. सॅनिटायझर वापरल्याने आणि मीठ घातलेले गरम पाणी प्यायल्याने करोना जातो, हे त्यातील एक उदाहरण. अशा अनेक आरोग्यटिपा पसरवल्या गेल्या. त्यातून या उपायांचा अतिरेक केल्याने आरोग्याचे इतर त्रास सुरू झाले.माहिती प्रदूषणाचे अनेक गंभीर परिणाम भोगावे लागतात. करोनासारख्या साथींच्या काळात रोगावरील लशीबद्दल कोणत्याही विश्वासार्ह माहितीच्या आधाराशिवाय चुकीची माहिती पसरवली गेली तर ती लसीकरण दर कमी करते; ज्यामुळे रोगाचा प्रादूर्भाव होण्याचा धोका वाढतो. गंभीर आजारांवर (उदा. कर्करोग, मधुमेह) उपचार म्हणून केलेल्या खोट्या जाहिराती वाचून केलेले उपचार रुग्णांसाठी धोकादायक ठरतात. नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेबद्दल किंवा सुरक्षिततेबद्दल दिशाभूल करणारी माहिती (उदा. पाणी, अन्न) चुकीचे निर्णय घेण्यास कारणीभूत ठरू शकते, ज्यामुळे टंचाई किंवा अति-शोषण होऊ शकते. इंटरनेटवरील माहितीच्या गोपनीयतेचे उल्लंघन करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर चाच्यांनी अनेक लोकांना लाखो रुपयाचा गंडा घातलेल्या बातम्या आपण रोजच वाचतो. आर्थिक घोटाळे, त्वरित श्रीमंत होण्याच्या योजना, किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींमुळे व्यक्ती आपली जमापुंजी गमावू शकतात. उत्पादनाचे खोटे दावे किंवा कंपन्यांबद्दल चुकीची माहिती ही खरेदीच्या निर्णयांवर प्रभाव टाकतात. त्यामुळे पैसे वाया जातात, तसेच उत्पादनांचा असुरक्षित वापर त्यातून होऊ शकतो.दिशाभूल करणारी माहिती लोकांमध्ये भीती, तणाव, गोंधळ आणि अविश्वास निर्माण करते. आत्मविश्वासाची कमतरता होऊ शकते. अशा परिस्थितीत योग्य निर्णय घेणे कठीण होते आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. माहितीच्या प्रदूषणापासून वाचण्यासाठी प्रत्येकाने योग्य खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. माहिती वापरण्यापूर्वी माहिती स्त्रोताचा लेखक, तारीख, संदर्भ तपासणे, लेखाचा अर्थ जाणून घेणे, स्वतःचे पूर्वाग्रह तपासणे, तसेच तज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. काही संकेतस्थळे माहितीचे प्रदूषण ओळखण्यासाठी तयार केली आहेत उदा.प्रत्येकाने माहितीसाक्षर असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे माहितीची विश्वासार्हता आणि उपयुक्तता तपासून लोक वैयक्तिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक परिस्थितीत चांगले निर्णय घेऊ शकतात. माहितीसाक्षरता ही माहितीचा तर्कशुद्धपणे विचार करण्यास प्रोत्साहन देते, तसेच तथ्य, मते आणि चुकीची माहिती यांत फरक ओळखण्यास मदत करते. माहिती साक्षरव्यक्ती स्वतंत्रपणे माहिती शोधण्याचे आणि वापरण्याचे कौशल्य आत्मसात करू शकते. अशा व्यक्तीची समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता वाढते. माहितीचा जबाबदारीने वापर, साहित्यिक चोरी, कॉपीराइट कायदे आणि विश्वासार्ह माहिती स्त्रोतांचे मूल्यांकन करणे हे सर्व माहितीच्या साक्षरतेमुळे समजते.लोकशाहीला खऱ्या अर्थाने बळकट करण्यासाठी माहिती साक्षरता अनिवार्य आहे. जर प्रत्येक नागरिकाने माहितीचे प्रदूषण थांबवण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेतला, तरच योग्य आणि विश्वासार्ह माहितीचा प्रवाह कायम राहील. चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीच्या निर्मूलनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारली तरच आपला समाज आणि आपली लोकशाही प्रगल्भ, सजग आणि प्रभावी होऊ शकतील

## पी.एम.किसान व नमो शेतकरी सन्मान निधीपासून शेतकरी वंचित असलेल्या

# शेतकऱ्यांना तात्काळ मध्ये या दोन्ही योजनेचा लाभ मिळवून द्यावा-नागनाथ माळगे

लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

धर्माबाद तालुक्यातील व शहरातील १ फेब्रुवारी २०१९ नंतर फेरफार केलेल्या शेतकऱ्यांना पी. एम किसान योजना व नमो शेतकरी सन्मान निधी या दोन्ही योजनेपासून तालुक्यातील व शहरातील असंख्य शेतकरी वंचित आहेत व सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पिक पाहणी पोर्टलवर नोंदीत कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना असंख्य शेतकरी वंचित असल्यामुळे त्यांच्या खात्यामध्ये अनुदान वर्ग करावे व खरीप हंगाम २०२३ च्या सातबारा उतारा वर नोंद आहे मात्र ई पीक पाहणी मध्ये त्यांचे नाव आलेले नाही अशा वंचित शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यामध्ये तात्काळ मध्ये अनुदान वर्ग करण्यात यावे अशा अशा प्रमुख तीन मागण्या सामाजिक कार्यकर्ते नागनाथ पाटील माळगे यांनी तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी महोदयाकडे लेखी निवेदनाद्वारे केले आहेत . २०१९ नंतर फेरफार केलेल्या धर्माबाद तालुक्यातील व शहरातील शेतकऱ्यांना न्याय मिळेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जवळपास चार वर्ष संपले तरी शेतकऱ्यांना या दोन्ही योजनेचा लाभ मिळत नसेल तर अडचणी काय ? हे तरी कळवा व सदरील शेतकरी २०१९ नंतर फेरफार केलेल्या पी. एम.किसान योजना व नमो शेतकरी सन्मान निधी या दोन्ही योजनेचा लाभ मिळत नसल्याने दोष कुणाचा असा प्रश्न धर्माबाद तालुक्यातील व शहरातील शेतकऱ्यांना पडला आहे या दोन्ही योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा तथा सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पिक पाहणी पोर्टलवर नोंदीत कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना असंख्य शेतकरी वंचित असल्यामुळे त्यांच्या खात्यामध्ये तात्काळ मध्ये अनुदान वर्ग करण्यात यावे व खरीप हंगाम २०२३ च्या सातबारा उतारा नोंद आहे मात्र ई पीक पहानी मध्ये त्यांचे नाव आले नाही अशा वंचित असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यामध्ये अनुदान वर्ग करण्यात यावे तथा तथा १ फेब्रुवारी २०१९ च्या नंतर फेरफार केलेल्या तालुक्यातील व शहरातील असंख्य शेतकरी पीएम किसान योजना व नमो शेतकरी सन्मान निधी या दोन्ही योजनेपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तात्काळमध्ये योजनेचा लाभ मिळावा माझी शासनाला विनंती आहे तालुक्यातील व शहरातील माझ्या मायबाप शेतकऱ्यांच्या प्रमुख तीन मागण्या आहेत हे तीन मागण्या तात्काळ मध्ये मार्गी लावून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी नागनाथ पाटील माळगे रोशनगावकर यांनी केली आहे.



# जिजामाता माध्य.शाळा व क.म.वि मध्ये शारदामातेची स्थापना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मोर्शी । प्रतिनिधी**

येथील विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, येरला ता.मोर्शी द्वारा संचालित जिजामाता माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,मोर्शी येथे दि.३ऑक्टोबर २०२४ रोजी शारदामातेची स्थापना सौ.विमलाताई विकासराव ठाकरे (उपाध्यक्षा, विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था,येरला), सौ.शोभाताई सुहासराव ठाकरे(कार्यकारिणी सदस्या,विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था,येरला.),

यांच्या शुभहस्ते झाली.प्रमुख अतिथी श्री विकासराव ठाकरे (सचिव,विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था,येरला.),सौ.शुभांगी जयंतराव सराटकर( आजीव सदस्या,विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, येरला.),प्राचार्य श्री सुधीरकुमार सवाई सर होते.

दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी रांगोळी स्पर्धा व आरती सजावट स्पर्धा मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आली.या स्पर्धेनंतर प्राचार्य श्री सुधीरकुमार सवाई यांच्या अध्यक्षतेत माता पालक मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ.माधुरी मंगेशसिंह गहरवार,सौ.सुरेखा गजाननराव राऊत,सौ.रंजना निलेशराव फुके, सौ.पद्मा ज्ञानेश्वरराव भड या होत्या. माता पालक मेळाव्याचे प्रास्ताविक श्री भुजंगराव भारती सर,संचालन श्रीमती प्रेमलता विरखरे मॅडम तर आभार श्रीमती अजमिरे मॅडम यांनी मानले.या कार्यक्रमाला बहुसंख्य माता-पालक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने झाली.दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी आरोग्य मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.प्रमुख वक्तया समुपदेशक डॉ.सौ.प्रतिभा घाटोळ यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना निरोगी आरोग्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री सुधीरकुमार सवाई होते.अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थी - विद्यार्थिनींनी आरोग्य विषयक मार्गदर्शन आचरणात आणून स्वतःचे आरोग्य निरोगी करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. उज्ज्वला ढोकणे मॅडम यांनी केले तर आभार कु.सिमा गाडगे मॅडम यांनी मानले. या सर्व कार्यक्रमांना सर्व शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी -विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

# वाघोली डॉक्टर्स असोसिएशनचा जीवन गौरव पुरस्कार डॉ.रघुनाथ रामकर यांना प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**




वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल आयमॅक्स मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलचे डॉ रघुनाथ रामकर यांना वाघोली डॉक्टर्स असोसिएशनच्या दांडिया सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त वाघोली येथील सिझन्स बँक्वेट हॉलमध्ये वाघोली डॉक्टर्स असोसिएशनच्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास असोसिएशनचे संस्थापक डॉ विनोद सातव, अध्यक्ष डॉ स्मिता कोलते, सचिव डॉ अनिता सातव, खजिनदार डॉ मयुरा बेहेळे यांच्या हस्ते डॉ रामकर यांना पुणेरी पगडी घालून सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे डॉ चंद्रकांत कोलते, विविध पत्रकार, पुणे मधील विविध कॉर्पोरेट हॉस्पिटलचे डॉक्टर्स, लेडीज कार्यकारिणी सदस्य डॉ अमृता विधाते, डॉ ज्योती जाधव, डॉ रश्मी खरात, डॉ वर्षा दवणे, डॉ निलिमा तेली, डॉ सविता हेगडकर, डॉ विजयालक्ष्मी जायभाये व सर्वच सदस्यांनी स्वागत व कौतुक केले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पत्रकार सौरभ गिरमकर व पत्रकार अलोक आगे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. ईतर उपस्थित पत्रकारांचा देखील सन्मान करण्यात आला.कार्यक्रमास वाघोली डॉक्टर्स असोसिएशनचे २५० सदस्य उपस्थित राहून गौरव पुरस्कार उत्साहात पार पडला. नवरात्र उत्सव सुरू झाला की महिलांना वेध लागतात ते गरबा दांडियाचे. हादग्याच्या रिंगणात गरबा, दांडिया साजरा होणार असेल तर तो दुग्ध शर्करा योगच म्हणावा लागेल. आपल्या दैनंदिन जीवनात समाजाच्या आरोग्याची अथकपणे सेवा बजावत असताना वाघोली डॉक्टर्स असोसिएशनच्या जीवनगौरव पुरस्काराच्या निमित्ताने सर्व डॉक्टरांनी एकत्र येत हा योग जुळवून आणला. या कार्यक्रमात म्युझिक, दांडिया, यासह अनलिमिटेड व्हेज जेवण यांचा आस्वाद घेत कार्यक्रमाची सांगता झाली.रास दांडिया कार्यक्रम सर्वसमावेशक होण्यासाठी श्री डान्स अकॅडमी यांनी उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शन सादर करत सर्वांना प्रोत्साहित केले.

# बार्शीच्या शिवाजी कॉलेजला जेतेपद २० युवा महोत्सवात १४ वेळी विजय



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर (वृत्तसंस्था)**

उत्तर सोलापूर २० व्या युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाने पटकावले. तर संगमेश्वर महाविद्यालय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अधिविभागास विभागून दुसरे बक्षीस,मिळाले. तर तिसरे पारितोषिक पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने पटकावले. शिवाजी महाविद्यालयाने हे १४ वे विजेतेपद पटकावले आहे. शुक्रवारी पारितोषिक वितरण समारंभ सैराटफेम अभिनेत्री रिंकू राजगुरू आणि अभिनेता आकाश ठोसर यांच्या हस्ते करण्यात आला. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर अध्यक्षस्थानी होते. आमदार सुभाष देशमुख, संस्थेचे अध्यक्ष रोहन देशमुख, प्र. कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा आदी उपस्थित होते. संगमेश्वर महाविद्यालयाने युवा महोत्सवात दुसरे स्थान पटकावला. युवा महोत्सवात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कलाकारांमधील विद्यार्थिनीस गोल्डन गर्ल तर विद्यार्थ्यास गोल्डन बॉयचा किताब दिला जातो. यंदाच्या गोल्डन गर्लची मानकरी बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्नेहल विधाते तर गोल्डन बॉयचा किताब संगमेश्वर महाविद्यालयाचा विद्यार्थी जैद शेख यांनी पटकावला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्य कलाकारांचा सन्मान करण्यात आला. या वेळी जल्लोष केला.

### स्पोर्ट्स मल्लखांब असोसिएशन जिल्हा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमानाने

# जिल्हास्तरीय शालेय मल्लखांब क्रीडा स्पर्धा २०२४/२५



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । भारत वानरे**

क्रीडा युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे.१ जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड शालेय मल्लखांब स्पर्धा स्थळ जिजाऊ सृष्टी मैदान सिडको नांदेड येथे आज दि १.१०.२४ रोजी संपन्न स्पर्धेतील उपस्थिती मान्यवर जिल्हा क्रीडा अधिकारी श्री राहुल श्रीरामवार.डॉ रमेश नांदेडकर. शारीरिक शिक्षक विनोद जमदाडे.कराटे संघटनेचे एकनाथ पाटील. शारीरिक शिक्षक विनोद वाघमारे. व तांत्रिक समितीचे पंच म्हणून सौरभ पवार.शैलेश मध्यलवार.खंडेश्वर सूर्यवंशी.वैभव हाडमोडे.विजय केंद्रे.दत्ता गोरगले.लक्ष्मीकांत मस्के.ज्योतदीप कौर यांची उपस्थितीमध्ये स्पर्धा संपन्न झालेअसून शहरी व ग्रामीण क्षेत्रातील शेकडो स्पर्धक खेळाडू उपस्थित होते सहभाग असलेले मुले व मुली खेळाडूंचे वयोगट u14/u17/u19 या वयोगटाप्रमाणे स्पर्धा संपन्न जिल्ह्यातील यशस्वी खेळाडू विभागीय स्पर्धेसाठी खेळाडूंना नांदेड मल्लखांब संघटनेचे सचिव कुलदीपसिंघ जट यांनी शुभेच्छा दिली.

# रॅम्प वॉक,तळ्यात मळ्यातचा खेळ,रमल्या मिळून साऱ्याजणी

### पंढरपूर व मंगळवेढ्यात ५ ठिकाणी घेतल्या स्पर्धा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पंढरपूर (वृत्तसंस्था)**



नवरात्री निमित्त भैरवनाथ शुगरचे उपाध्यक्ष अनिल सावंत यांच्याकडून होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षपद अनिल सावंत यांच्या पत्नी शैलजा सावंत यांनी भूषवले.

महिलांना कौशल्य दाखवण्यासाठी हक्काचं व्यासपीठ मिळावे यासाठी अनिल सावंत यांच्याकडून सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम देखील त्याचाच भाग आहे. आतापर्यंत पंढरपूर - मंगळवेढा शहरात वेगवेगळ्या ठिकाणी एकूण ५ वेळा खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शैलजा सावंत यांच्या हस्ते उपस्थित प्रत्येक महिलेस साडीचे वाटप करण्यात आले. पंढरपूर तालुक्यातील विविध पदाधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.यावेळी बोलताना शाम गोगाव यांनी, अनिल सावंत हे वारकरी कुटुंबातून येतात. सांप्रदायाची शिकवण, विचार दादांना लहानपणापासूनच मिळाला आहे. समाजसेवा हीच ईश्वर सेवा' हे लहानपणीच समजल्यामुळे दादा सातत्याने गरीब आणि सामान्यांना न्याय आणि मदत करत असतात. कुठलेही पद नसताना दादा ही सगळी कामे करू शकतात. त्यामुळे अनिल दादांना विधानसभेत जाण्याची एक संधी द्या, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात विविध खेळाचे आयोजन करण्यात आले होते. रॅम्प वॉक तळ्यात मळ्यात, डान्स, फुगा फोडणे. इत्यादी खेळाचे आयोजन केले होते. होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण शैलजा सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.यांनी मिळवले बक्षीस गायत्री साळुंखे, एलईडी टीव्ही श्वेता नवत्रे, फ्रीज राधिका आवती, वॉशिंग मशिन अंजना नेहतराव, पिठाची चक्की अर्चना वेदपाठक, शिलाई मशीन

# जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते पोहरादेवीत लोकार्पण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात उभारण्यात येणाऱ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या ५ सोलर पार्कचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी येथे करण्यात आले.

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान अर्थात पीएम कुसुम योजनेच्या आधारे राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये ९२०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरू असून ते टप्प्या टप्प्याने सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार आहे. त्यापैकी धोंदलगाव (जिल्हा छत्रपती संभाजीनगर), बामणी बुद्रक (जिल्हा नांदेड), हरोली (जिल्हा कोल्हापूर), जलालाबाद (जिल्हा अकोला), पलशी बुद्रुक (जिल्हा बुलढाणा) या एकूण १९ मेगावॅट क्षमतेच्या पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण आज झाले. सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीस मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना पंतप्रधानांच्या हस्ते २०.५५ कोटी रुपये विकासनिधी ऑनलाईन पद्धतीने देण्यात आला.

४८०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीसाठी टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सर्व प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होऊन राज्यात शेतीसाठी पूर्णपणे होऊन विजेचा पुरवठा होईल. या योजनेत एकाच हेतूने राज्यात विविध ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून अशा विकेंद्रित स्वरुपातील हा जगातील सर्वात मोठा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. योजनेच्या अनुषंगाने राज्यात शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वीजनिर्मिती कंपनी स्थापन करण्यात आली आहे.एप्रिल २०२३ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ला मंजुरी दिल्यानंतर राज्याचा ऊर्जा विभाग आणि महावितरणने केवळ अकरा महिन्यात ४० हजार एकर सार्वजनिक जमीन उपलब्ध करणे, सौर ऊर्जा निर्मितीसाठीची टेंडर प्रक्रिया पूर्ण करणे, वीज खरेदीचे करार करणे, वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे आणि विकसकांना ९२०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मितीची लेटर ऑफ वॉर्ड देणे ही कामे केली.खासगी गुंतवणूकदारांकडून एकूण ६५ हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार असून ग्रामीण भागात ५० हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. सध्याच्या साडे आठ रुपये प्रती युनिट दराच्या ऐवजी सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या किफायतशीर दराने वीज उपलब्ध होणार असल्याने वीज खरेदीमध्ये दरवर्षी १० हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी राज्य सरकारवरील वार्षिक ४५०० कोटी रुपये अनुदानाचा व उद्योगांवरील वार्षिक १३ हजार कोटी रुपयांचा क्रॉस सबसिडीचा बोजा दूर होईल. तसेच हरित ऊर्जेचा वापर केल्यामुळे पर्यावरण रक्षणाला मदत होईल.



# जुई धरण प्रकल्पाने घेतला मोकळा श्वास ;जुई धरणात १०० टक्के पाणी साठा

## मागील महिन्यात झालेल्या पाऊसा मुळे जुई धोरणाने क्षमता गाठली असून परिसरात आनंदाचे वातावरण झाले आहे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील दानापुर येथील जुई मध्यम प्रकल्प या वर्षी १०० टक्के कोरडा होता. परंतु सप्टेंबर महिन्यात जिल्ह्यातील बहुतांश भागात मद्यम ते मूसळधार पाऊस पडला त्यामुळे आनवा, गोळेगाव, वाकडी,सारोळा, पाडा, उंडणगाव ,सुरंगळी,मूर्तड या आदी भागात मोठा पाऊस झाल्यामुळे जुइधरण मधे आज रोजी १००% पर्यंत जलसाठ्यात वाढ झाली आहे म्हणजेच १७ फूट पर्यंत पाणी साठा झाला आहे त्यामुळे यदा ही २५ गावांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागला . मागील दोन वर्षा पासून सलग दोन वर्ष जून च्या शेवटच्या आठोड्या हा प्रकल्प भरलेला होता परंतु यंदा जून,जुलै, ऑगस्ट सप्टेंबर पर्यंत ० टक्के जलसाठा उपलब्ध होता व सप्टेंबर महिन्या च्या शेवट च्या आठवड्यात धरणाला पाण्याची आवक वाढली ९०% पाणी पातळीत वाढ झाली. त्या नंतर परिसरातील पाण्याच्या आवक हळूहळू काळ्या पाण्याने आज रोजी जुई धरणत १०० टक्के पाणी साठा आहे भोकरदनशहर सहित २० गवांची चिंता वाढलेला होती यंदा पिण्याच्या पान्याचा प्रश्न मार्गी लागनार कि नाहि. हा प्रश्ना जनते समोर पडला होता परंतू या मागीलमहिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पडलेल्या पावसाने मात्र धरणाच्या जलसाठयात वाढ झालेली आहे व परिसरतील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.



जुई धरणात ९७ टक्के पाणी साठा झाला असून पाणी टंचाई होणार नाही सप्टेंबर च्या शेवट च्या आठवड्यात जोरदार पाऊस झाल्याने धरणात ९७ टक्के जल साठा झाला आहे —सचिन राठोड शाखा अधिकारी जुई धरण

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथील जुई धरण हे धरणाची ओळख सर्वात मोठा धरण म्हणून तालुक्यात ओळख जाते हा धरण सप्टेंबर च्या शेवटच्या आठवड्यात जवळपास १०० टक्के जलसाठा निर्माण झाल्यामुळे परिसरातील नागरिकांची पिण्याची पाण्याची व्यवस्था दूर झाली आहे या धरणामुळे जवळपास ६०० हेकटर जमिनीला सिंचनासाठी वापर होतो याचा फायदा तालुक्याला मोठ्या प्रमाणात होणार आहे. —संतोष दानवे ,आमदार भोकरदन जाफराबाद

# कधीही आवाज ध्या,धस कुटुंबीय प्रत्येकाच्या सुखादु:खात सदैव हजर—जयदत्त धस



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या प्रचारार्थ आज शेरी बु येथे सवांद दौरा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी जयदत्त धस बोलत असताना युवकांच्या अडीअडचणी,गावातील समस्या समजून घेतल्या तसेच मूलभूत सुविधा लाईट, रस्ता,शाळा अशा अनेक विषयावर चर्चा करून त्यावर संबंधित अधिकारी यांना फोन करून तात्काळ सोडवण्यास सांगितले. पुढे बोलताना जयदत्त धस म्हणाले की आमचे कुटुंब हे जातीपातीच्या पलिकडे जाऊन सर्वांच्या सुखादु:खात सतत पाठीशी खंबीरपणे उभे रहाण्याचे काम करत आहे, राजकीय पटलावर काम करत असताना गेले पंधरा वर्षांपासून मतदार संघातील प्रत्येकाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी वर्षभर चोवीस तास मा.आ.धस आण्णा उपलब्ध असतात , विशेष म्हणजे शेरी गावावर आण्णा चे जास्त प्रेम असून आतापर्यंत सरपंच संदिप खाकाळ यांच्या पाठपुरावाच्या जोरावर कोट्यवधी रुपयांचे कामे दिली असून त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत तर अनेक कामे प्रगती पथावर आहेत, त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत तुम्ही मतदान रूपाने आशीर्वाद द्या आम्ही नक्कीच त्यातून उतराई होण्यासाठी प्रयत्न करू असा विश्वास जयदत्त धस यांनी दिला.

### आ.सुरेश धस म्हणजे शास्वत विकास :— सरपंच खाकाळ

**गेल्या अनेक वर्षांपासून प्राथमिक शाळेचा प्रश्न प्रलंबित असताना अनेकदा त्याविषयी निवेदन दिले अनेक आंदोलन केले परंतु त्याला यश आले नाही, याबाबत आम्ही शाळा खोल्याचा विषय आ.धस आण्णा जवळ काढला अन त्यांनी ताबडतोब शाळा खोल्यासाठी जिल्हा नियोजन योजने अंतर्गत चाळीस लक्ष रुपये मंजूर केले, ते काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. यावेळी जयदत्त धस यांनी शाळा खोल्यांची पहाणी करून सरपंच खाकाळ व ग्रामस्थांचे कौतुक केले. यावेळी गणप्रमुख अस्लम सय्यद,प्रदीप बांदल,महेश खाकाळ,राजू रासकर, श्रीराम सोनवणे, राहुल गोरे,शिवाजी डोरले,परशुराम शिरोळे, निलेश महाडिक, सुखदेव महाडिक,अक्षय गोरे, अक्षय कर्डीले,राजू जाधव किशोर सोनवणे, बाळू खाकाळ, यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.**

आपल्या गावाचा सर्वांगीण विकास करून गावात परिवर्तन घडवून आणायचे असेल गावातील तरूणांनी खंबीरपणे पाठीशी उभं राहून अण्णाचे हात बळकट करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन महेश खाकाळ यांनी केले

# येवती येथील चिमुकल्यांनी केला कमळजा माता परिसर प्लास्टिक मुक्त



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा येवती येथील मुलांची क्षेत्रभेट या उपक्रमा अंतर्गत नवरात्र उत्सवानिमित्त जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथील कमळजा देवीच्या दर्शनासाठी छोटी सहल गेली होती.

या सहली दरम्यान शाळेतील विद्यार्थ्यांना लोणार सरोवरातील विविध मंदिरे,पाण्याचे खळखळ वाहणारे झरे, पक्षांचे मंजुळ आवाज,नैसर्गिक वातावरण याचा प्रत्यक्ष अनुभव दिला गेला. पर्यावरण जतन करण्यासाठी प्लास्टिक मुक्ती ही काळाची गरज आहे याची शिकवण देत कमळजा माता मंदिर परिसर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी शाळेतील शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी मोलाचा वाटा उचलला.

त्यांच्या या उपक्रमाचे लोणार पंचक्रोशीतून कमळजादेवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविक भक्तांनी, व मी लोणारकर टीम यांनी अभिनंदन व कौतुक केले. विद्यार्थ्यांना फलाहार देऊन विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी स्मरणात राहील अशा सहलीचा आनंददायी प्रवास संपन्न झाला.

# ८ सप्टेंबर पासून महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे बेमुदत कामबंद आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

ग्रामपंचायत मध्ये काम करणारा अत्यंत गरीब असणारा घटक म्हणजे ग्रामपंचायत चे शिपाई, पाणी पुरवठा,लिपीक हे कर्मचारी शासनाकडून येणाऱ्या प्रत्येक योजना जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम हा कर्मचारी करतो,गावागावात पाणी सोडण्याचे काम हा कर्मचारी करतो,गावागावात जेवढ्या काही शासकीय मालमत्ता आहे.त्याची देखभाल हा कर्मचारी करतो,गावागावात जेवढे काही राष्ट्रीय सन राबविले जातात त्याचे नियोजन हा कर्मचारी करतो.एवढेच नाही तर कोरोना काळात या कर्मचाऱ्याचे खूप मोठे योगदान राहिले आहे परंतु यांचे कोठेच कौतुक करण्यात आले नाही.

याच कर्मचाऱ्यावर आज उपासमारीची वेळ आली आहे. याच ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या पंचायत समिती स्थरावर मागील बऱ्याच वर्षांपासून मागण्या प्रलंबित आहेत.त्यात २००७ पासून थकीत राहणीमान भत्ता अद्याप कर्मचाऱ्याच्या तात्काळ वर्ग करण्यात यावा, थकीत भविष्य निर्वाह निधी रक्कम ८.३३% प्रमाणे कर्मचाऱ्याच्या ऋ.झ.ऋ.खात्यावर तात्काळ वर्ग करण्यात यावी,उत्पन्न आणि कर वसुलीच्या जाचक अटी मुळे ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन कमी प्रमाणात झाले आहे त्यांना ग्रामपंचायतकडून मागील सर्व उर्वरित वेतन रक्कम देण्यात यावी,कर आणि उत्पन्न वसुली ची जबाबदारी फक्त ग्रामपंचायत कर्मचारी नसून वसुलीसाठी सरपंच आणि ग्रामसेवक यांची पण आहे याची ग्रामपंचायतेस जाणीव करून द्यावी,पाणी पुरवठा कर्मचाऱ्याला रेनकोट, बॅटरी,हातामोजे,सर्क्रूड्रायव्हर, टेस्टर,पक्कड,गमबूट इत्यादी सर्व सेफ्टी किट वाटप करण्यात याव्यात,कर्मचारी हा लाईट खात्याचा कर्मचारी नाही म्हणून त्यास लाईट खात्याची कामे लावू नये, प्रत्येक कर्मचाऱ्यांना वर्षातून किमान दोन गणवेश देण्यात यावे,तसेच गाव स्थरावर काम करत असताना विनाकारण कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक त्रास देण्यात येतो तो थांबवावा याच कारणासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ केज यांच्या कडून ८ ऑक्टोबर पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे तालुक्याचे अध्यक्ष कॉ.मस्सू शिवाजी कांबळे आणि सचिव कॉ.कल्याण माधवराव चाटे यांनी माहिती दिली.

# श्रीगोंदा शहरामध्ये पालखी क्रं १ च्या वतीने होणार जगाच्या मालकाचा जन्मोत्सव सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्री संत बाळूमामा देवालय ट्रस्ट आदमापूर ता भुदरगड जि.कोल्हापूर संचालित श्री संत बाळूमामा मेंढी माऊली पालखी सोहळा दि.१० ऑक्टोबर रोजी घारगाव येथुन प्रस्थान होऊन श्रीगोंदा शहरामध्ये औटेवाडी येथे आगमन होत आहे.दररोज सकाळी आणि सायं ९ महाआरती व महाप्रसाद होईल. श्रीगोंदा शहरामध्ये १५ ऑक्टोबर रोजी साजरा होणार जगाच्या मालकाचा भव्य दिव्य जन्मोत्सव सोहळा पालखी क्रमांक १ ने आयोजीत केलेला असून विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.१४.१०.२०२४ रोजी भागवत एकादशी निम्मित बाळूमामांचा हरी जागर होणार आहे .मंगळवार दि १५.१०.२०२४ रोजी पहाटे ४ वाजता श्रींचा दुग्ध महाभिषेक होईल सकाळी ९ वाजता श्रींची महाआरती नंतर दुपारी २ ते ४:२० पर्यंत ह.भ.प.गुरुवर्य संजीवनीताई शिंगाडे नातेपुते माळशिरस यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर ठीक ४:२३ मि. बाळूमामा जन्मोत्सव सोहळा, पुष्पवृष्टी त्यानंतर पाळणा गायला जाईल. दु. ४:३० वा बाळूमामांची महाआरती व नंतर महाप्रसाद होईल.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती श्री बाळूमामा देवालय (ट्रस्ट) सर्व विश्वस्थ मंडळ व सर्व ग्रामस्थ आदमापूर यांची असणार आहे.पालखीचे कारभारी गुंडोपंत पाटील, उपकारभारी विठ्ठलभाऊ पांडूळे तसेच संयोजक औटेवाडी,औटेवस्ती, हिरडेवाडी, सप्रेमळा, म्हेत्रेमळा, खेतमाळीस मळा, दांडेकर मळा श्रीगोंदा शहर आयोजकांच्या वतीने सदर जन्मोत्सव सोहळ्यास सर्व महिला पुरुष, लहान थोर भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.






सामाजिक क्षेत्रात निस्वार्थपणे आणि उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दैनिक लोकनेता चे हवेली तालुका प्रतिनिधी संतोष कदम यांना वाघोली डॉक्टर्स असोसिएशन तर्फे सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904